पुण्य नगरी
रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ | SMART कोल्हापूर

# भारती विद्यापीठात वर्ल्ड कॅन्सर डे निमित्त कार्यक्रम

## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे आयोजन



कोल्हापूर : येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभाग व अंकुरम इनोव्हेटर्स हब यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आणि जिल्हा शल्यचिकित्सक हॉस्पिटल, कोल्हापूर यांच्या सहकार्याने वर्ल्ड कॅन्सर डे निमित्त राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा उद्देश कॅन्सरबद्दल जागरूकता वाढवणे आणि तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल लोकांना शिक्षित करणे हा आहे. थीम 'युनायटेड बाय युनिक' अशी आहे. कार्यक्रमाचे आयोजन जिजामाता कल्चरल हॉल, आर. के. नगर, मोरेवाडी, कोल्हापूर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात तज्ज्ञ डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित राहून तंबाखू नियंत्रण आणि कॅन्सर प्रतिबंध यावर मार्गदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. विद्या काकडे यांनी केले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, डॉ. विक्रम आरळेकर, मोरेवाडी सरपंच ए. व्ही. कांबळे, चंद्रकांत पवार, क्रांती शिंदे, चारुशीला कनसे, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, विभागप्रमुख डॉ. पी. बी. चौधरी, समन्वयक पी. के. माने, उपस्थित होते. तर डॉ. पी. बी. वर्णे यांनी आभार मानले.

लोकमत
गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६

# भारती विद्यापीठ फार्मसीच्या विद्या काकडे प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीची पीएच.डी विद्यार्थिनी विद्या काकडे यांनी संजय घोडावत विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन परिषदेत उल्लेखनीय यश मिळविले. ओरल प्रेझेंटेशन विभागात प्रथम क्रमांक पटकाविला.

इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन सस्टेनेबल हेल्थ केअर, फूड सायन्स ॲण्ड एनर्जी रिसर्च' या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी 'अँटी - फंगल ॲक्टिव्हिटी युजिंग काम्पुटेशनल स्टडी ' या विषयावर त्यांनी संशोधन सादर केले. त्यांच्या संशोधनातील वैज्ञानिक गुणवत्ता, नावीन्यपूर्ण दृष्टिकोन आणि प्रभावी मौखिक सादरीकरण याच्या जोरावर त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया यांचे त्यांना सहकार्य आणि प्रा. आर. पी. ढवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजित कदम यांनी काकडे यांचे विशेष अभिनंदन केले. (वा. प्र)

कोल्हापूर दिनांक पान ४

तरुण भारत संवाद

शुक्रवार, ६ मार्च २०२६

# भारती विद्यापीठमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन



कोल्हापूर : कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना मान्यवर.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर शाखेत 'राष्ट्रीय विज्ञान दिना' निमित 'फार्मइन्व्हेंशिया २०२६' उत्साहात झाले. कार्यक्रमात औषधनिर्माण क्षेत्रातील नवीन संशोधनतांत्रिक प्रदर्शने व विद्यार्थी सादरीकरणाचा उत्तम संगम पाहायला मिळाला.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया यांच्या हस्ते राज्याचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री, भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगरावजी कदम यांच्या प्रतिमेचे पुजन केले. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी फार्मसी क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, डॉ. पी. बी. चौधरी (आयआयसी प्रेसिडेंन्ट), डॉ. डी. ए. भागवत, प्रा. आर जे जरग यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचर्या डॉ. एच. एन. मोरे म्हणाले, औषधनिर्माण शास्त्रातील नवनवीन संशोधनाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत एकूण ८३ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला.

मुख्य समन्वयक म्हणून प्रा. सी. पी. के. माने, प्रा. डॉ. एस. ए. अरविंदेकर आणि प्रा. यू. आर. यादव यांनी काम पाहिले. परीक्षक म्हणून अमित बेलेकर, डॉ. शुभांगी सुतार, डॉ. नीला भाटिया आणि डॉ. आर. पी. ढवळे यांनी काम पाहिले. कार्यकमाच्या नियोजनासाठी भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कार्यकारी संचालक हेल्थ सायन्सेस डॉ. अस्मिता जगताप यांनी मार्गदर्शन केले. तनिष्का खटावकर यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अरविंदेकर यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा निकाल असा :**

बी. फार्म मॉडेल स्पर्धा – प्रथम क्रमांक : सायली घोडके आणि उज्वल भोसले, द्वितीय क्रमांक सिध्दी भोरे, उत्तेजनार्थ तन्वी चिंचणेकर, युवराज देशमाने, सृष्टी मेथे, केतन मांगलेकर, राजवर्धन पाटील.

डिप्लोमा मॉडेल स्पर्धा – प्रथम क्रमांक : स्मिता चव्हाण, द्वितीय जान्व्ही सावंत व शिरडोणे साहील, उत्तेजनार्थ माने हर्षा.

एम. फार्म ओरल स्पर्धा – प्रथम क्रमांक : श्रुती किल्लेदार, द्वितीय महेश कोरे, उत्तेजनार्थ श्रेया पाटकर.

पुण्य नगरी
बुधवार, १४ जानेवारी २०२६

# 'भारती विद्यापीठ फार्मसी'मध्ये 'फार्माकॉम' उत्साहात

## डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूरमध्ये राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा (फार्माकॉम) उत्साहात झाली. डॉ. पतंगराव कदम यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्रचार्य डॉ. एम. एम. भाटिया यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

डॉ. पतंगराव कदम : शैक्षणिक व सामाजिक क्रांतीचे प्रणेते, गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन, फार्मा कोव्हिजिलन्स : तुमची सुरक्षा एका क्लिकवर, भारतीय औषधनिर्माण क्षेत्र : लसीकरण जागरूकता औषधनिर्माता त्याची निष्ठा, औषध निर्माण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांती आदी विषयांवर ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. प्रज्ञा [illegible], डॉ. प्रकाश मुंज, डॉ. राकेश पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धेतील विजेते अनुक्रमे असे : अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसीचा विद्यार्थी [illegible] गाडेगावकर, अण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टाच्या सिद्धी मोरे, [illegible] पवार, [illegible] कॉलेजची प्रणोती पवार, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे [illegible] टक्कर, स्पर्धेच्या मुख्य समन्वयक प्रा. प्रज्ञा माने, सहसमन्वयक प्रा. उत्कर्षा यादव यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. विपिन पाटील, श्रुती किल्लेदार यांनी केले.



कोल्हापूर : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा (फार्माकॉम) च्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

पुण्यनगरी

कोल्हापूर | बुधवार, १४ जानेवारी २०२६

# स्क्रीन टाईमवर नियंत्रण आवश्यक : डॉ. मुक्ता चैतन्य

## भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर : प्रतिनिधी

डिजिटल तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे डिजिटल फटिक, टेक्सनेक सिंड्रोम, टेक्सटिंग थंब, वायब्रेशन सिंड्रोम यासारखे विकार वाढलेले आहेत. आपण मोबाईल स्क्रीनवर किती वेळ घालवतो, याची जाणीव ठेवून त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्त्या लेखिका डॉ. मुक्ता चैतन्य यांनी केले. त्या राज्याचे माजी मंत्री, भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंती निमित्ताने आयोजित स्मृती व्याख्यानमालेत 'तंत्रज्ञानाचे व्यसन' या विषयावर भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल येथे बोलत होत्या.

डॉ. मुक्ता चैतन्य म्हणाल्या, एंगेजमेंट इकॉनॉमी आणि एआय माध्यमांमुळे आपले




कोल्हापूर : भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्मृती व्याख्यानमालेप्रसंगी उपस्थित मान्यवर.

वैयक्तिक आयुष्य सार्वजनिक होत आहे. मोबाईलच्या दुनियेत हरवून आपण किती वेळ अपव्यय करतो, याकडे लक्ष केंद्रित करणे अत्यंत गरजेचे आहे. आठवड्यातून किमान एक दिवस 'नो स्क्रीन डे' पाळणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाला व्यसन बनवून हायब्रिड-आभासी आयुष्य जगू नका, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक प्राचार्या डॉ. एच. एन. मोरे यांनी केले. डॉ. पतंगराव कदम यांची जयंती आणि भारती विद्यापीठाचे कार्यवाह अभिमत विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरू डॉ. विश्वजित कदम यांचा वाढदिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून साजरा केला जातो. त्यापैकी एक उपक्रम म्हणजे ही पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमाला, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंदराव पाटील म्हणाले, डॉ. पतंगराव कदम यांनी अविरत कष्ट केले. त्यांनी केलेल्या कार्यातून आपण प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल केली पाहिजे.

सूत्रसंचालन प्रा. डॉ भक्ती भोसले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. किर्ती कदम करून दिला. डॉ. व्ही. आर. घोरपडे यांनी आभार मानले. डॉ. आर. यु. कंठे, एम. एस. देशमुख, डॉ. एम. एम. खैरनार, डॉ. ए. ए. मुके, सेव्हीओ फर्नांडिस, ए. एम. गडदे, आर. के. पाटील यांच्यासह भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलातील शाखाप्रमुख उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाला व्यसन बनवून आभासी आयुष्य जगू नका : डॉ. चैतन्य

## भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलात डॉ. पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करा, गैरवापर टाळावा. डिजिटल तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे डिजिटल टेक्सनेक सिंड्रोम, टेक्सटिंग थंब, व्हायब्रेशन सिंड्रोम यांसारखे विकार वाढले आहेत. मोबाईलच्या दुनियेत हरवून आपण किती वेळेचा अपव्यय करतो, याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. आठवड्यातून किमान एक दिवस 'नो स्क्रीन डे' पाळावा. तंत्रज्ञानाला व्यसन बनवून हायब्रिड-आभासी आयुष्य जगू नका, असे आवाहन लेखिका डॉ. मुक्ता चैतन्य यांनी केले.

भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये डॉ. पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमालेत त्या 'तंत्रज्ञानाचे व्यसन' या विषयावर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी आनंदराव पाटील होते.

डॉ. चैतन्य म्हणाल्या, इकॉनॉमी व एआय माध्यमांमुळे वैयक्तिक आयुष्य सार्वजनिक होत आहे. त्यामुळे खासगी आयुष्य सार्वजनिक करू नका. मोबाईल स्क्रीनवर किती वेळ घालवतो, याची जाणीव ठेवून त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

डॉ. एच. एन. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. भक्ती भोसले यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. कीर्ती कदम यांनी करून दिला. डॉ. व्ही. आर. घोरपडे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. आर घोरपडे, डॉ. आर. यू. कंटे, एम. एस. देशमुख, डॉ. एम. एम. खैरनार, डॉ. ए. ए. मुके, सेव्हीओ फर्नांडिस, ए. एम. गडदे, आर. के. पाटील उपस्थित होते.




**कोल्हापूर : भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये डॉ. पतंगराव कदम स्मृती व्याख्यानमालेप्रसंगी लेखिका डॉ. मुक्ता चैतन्य यांचे स्वागत करताना आनंदराव पाटील. सोबत डॉ. एच. एन. मोरे, प्राचार्य डॉ. व्ही. आर घोरपडे आदी.**

**(छाया : अर्जुन टाकळकर)**

सकाळ TODAY

कोल्हापूर, मंगळवार, १३ जानेवारी २०२६

१३
जानेवारी

वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा



# मा. आ. डॉ. विश्वजित कदमसाहेब

कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

- भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर
- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर (डिग्री अँड डिप्लोमा)
- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोल्हापूर (डिग्री अँड डिप्लोमा)
- भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूल, कदमवाडी, कोल्हापूर
- भारती विद्यापीठ इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, कोल्हापूर
- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आयुर्वेद अँण्ड हॉस्पिटल, कोल्हापूर
- भारती विद्यापीठ प्रशाला, पाचगाव
- भारती विद्यापीठ आनंदराव पाटील प्रशाला, बेलेवाडी, कोल्हापूर



सर्व शाखाप्रमुख, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी

## भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल, कोल्हापूर

सकाळ TODAY

कोल्हापूर, मंगळवार, १३ जानेवारी २०२६

# शिक्षणनिष्ठ, समाजाभिमुख नेतृत्व

**डॉ. विश्वजित पतंगराव कदम हे भारती विद्यापीठाचे कार्यवाह तसेच भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. वडिलांनी उभारलेल्या भारती विद्यापीठाचा समृद्ध शैक्षणिक वारसा ते आधुनिक दृष्टिकोन, गुणवत्ता आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून समर्थपणे पुढे नेत आहेत. शिक्षण, समाजसेवा आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे.**

**- डॉ. महेंद्र सु. खैरनार**

डॉ. विश्वजित कदम यांचा जन्म १३ जानेवारी १९८० रोजी झाला. त्यांनी बी. ई., एम.बी.ए. आणि पीएच.डी. (मॅनेजमेंट) असे उच्च शिक्षण पूर्ण केले असून, हार्वर्ड विद्यापीठातून शिक्षण व्यवस्थापन व नेतृत्व विषयक विशेष प्रशिक्षण घेतले आहे. भारती विद्यापीठाचे सचिव व प्र-कुलगुरू म्हणून काम करताना 'भारतीय मूल्यांवर आधारित जागतिक दर्जाचे शिक्षण' हा त्यांचा स्पष्ट दृष्टिकोन आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठात कौशल्याधारित व संशोधनप्रधान अभ्यासक्रम, डिजिटल शिक्षण, उद्योग-शिक्षण संस्था सहकार्य, नवोन्मेष व स्टार्ट-अप संस्कृतीला चालना दिली. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर त्यांचा विशेष भर आहे. डॉ. कदम पलूस-कडेगाव मतदारसंघातून विधानसभेसाठी प्रतिनिधित्व करतात. या मतदारसंघात त्यांनी



डॉ. विश्वजित कदम

शेती, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण व युवक रोजगार या प्रश्नांवर सातत्याने लक्ष केंद्रित केले आहे. २०१८ मध्ये ते आमदार झाले आणि २०१९ मध्ये पुनः निवडून आले. राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांनी सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न व नागरी पुरवठा, अल्पसंख्याक विकास व मराठी भाषा अशा विविध खात्यांमध्ये प्रभावी काम केले.

सांगली-कोल्हापूर पूरपरिस्थिती तसेच कोरोना महामारीच्या काळात त्यांनी केलेले काम लक्षात राहण्यासारखे होते. भारती विद्यापीठाच्या आरोग्य सुविधा सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत उपलब्ध करून देत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. ग्रामीण विकास, आरोग्य शिबिरे, महिला बचत गट, युवक प्रशिक्षण व रोजगार संधी या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागासाठी काम केले आहे. फुटबॉल हा त्यांचा आवडता खेळ असून, युवकांमध्ये शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित व्हावेत यासाठी ते क्रीडा उपक्रमांना प्रोत्साहन देत आले आहेत. शिक्षण व्यवस्थापन, लोकप्रतिनिधित्व आणि समाजसेवा यांचा प्रभावी समन्वय साधत डॉ. विश्वजित कदम यांनी आधुनिक, दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला आहे.

**(लेखक भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य आहेत)**


कोल्हापूर

तरुण भारत संवाद

सोमवार, ९ मार्च २०२६

# प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व : शिक्षणमहर्षी डॉ. पतंगराव कदम

**समाजातील जाणत्या व्यक्तिमत्त्वांनी केलेले कार्य केवळ त्यांच्या काळापुरते न राहता, पुढील पिढ्यांना दिशा देणारे ठरते. शिक्षणमहर्षी (कै.) डॉ. पतंगराव कदम हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. शिक्षण समाज परिवर्तनाची शक्ती आहे, हे समजून त्यांनी उभारलेला ज्ञानाचा दीप आजही लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य फुलवत आहे. आज ९ मार्च रोजी असलेल्या त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...!**



■ **डॉ. पतंगराव कदम यांचा आज स्मृतिदिन**

सोनसळ (जि. सांगली) या गावात साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेले पतंगराव कदम यांचे बालपण ग्रामीण वास्तवाशी जोडलेले होते. त्या काळात शिक्षणाच्या सुविधा कमी होत्या. उच्च शिक्षण तर दूरच होते. राज्याच्या अनेक गावांमध्ये शाळाही नव्हत्या. शिक्षणाअभावी समाजप्रगतीला मर्यादा येतात, हे त्यांना उमजले. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज उन्नतीचे स्वप्न पाहून १० मे १९६४ साली पुण्यात भारती विद्यापीठाची स्थापना केली. मर्यादीत साधनसामग्रीत सुरू झालेली ही संस्था सध्या शैक्षणिक विश्वच बनली. आजमितीला भारती विद्यापीठ हे ज्ञान, संशोधन आणि संस्काराचे केंद्रही झाले आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, व्यवस्थापन, कायदा, कला, विज्ञान यासह विविध शाखांमध्ये हजारो विद्यार्थी शिकत आहेत. खेड्यापाड्यातील मुला-मुलींना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळते आहे.

डॉ. कदम यांनी महाराष्ट्राच्या राजकारणातही प्रभावी भूमिका बजावली. मंत्रिमंडळात विविध खात्यांचे मंत्री म्हणून काम करताना त्यांनी विकासाभिमुख दृष्टीकोन ठेवला. शिक्षणाचा प्रसार, ग्रामीण विकास आणि युवकांना संधी ही त्यांची उद्दिष्ट होते. त्यांच्या कार्यपद्धतीत दूरदृष्टी व नियोजन यांचा सुंदर संगम दिसायचा. एखादी संस्था उभारणे अवघड असते. शिवाय ती टिकवून विकसित करणे कठीण जाते. कदम यांनी गुणवत्तेच्या जोरावर शिक्षण संस्था टिकवल्या. मुला-मुलींच्या पालकांचा विश्वासही मिळवला. इतकेच नव्हे तर त्यांनी मुला-मुलींना विविध क्षेत्रात नोकरी मिळवण्यापासून ते उच्च पदे प्राप्त करण्याची बहुमोल संधी मिळवून दिली.

डॉ. कदम यांनी आयुष्यभर साधेपणा जपला. त्यांनी लोकांशी जोडलेले आपुलकीचे नाते तर कधीच नजरेआड होऊ शकत नाही. समाजातील सर्वसामान्य माणसांच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत दूरदृष्टी, नियोजन याचा सुंदर संगम दिसून येतो. आपले काम घेऊन आलेल्या प्रत्येक माणसाला डॉ. कदम यांनी आधार दिला. त्यांची पेंडींग कामे अगदी तळमळीने पुर्णत्वाला नेली. त्यांच्याकडे आलेल्या माणसांचे काम होऊ नये, असा त्यांनी कधीच विचार केला नाही. म्हणूनच ते समाजप्रिय बनले. गेल्या ६० वर्षांच्या कालावधीत त्यांच्या शिक्षण संस्थामधून लाखो विद्यार्थी घडवले गेले. आजही घडवले जात आहे. शिक्षण संस्थांमध्ये सेवा केलेल्या अनेक नोकरदारांच्या कुटुंबांचे भविष्य उजळून टाकले. आणि काही हजाराच्या घरात तरुणांपासून ते ज्येष्ठ मंडळी शिक्षण संस्थांमध्ये मोठ्या विश्वासाने सेवा बजावत आहे. त्यामुळेच डॉ. कदम हे नाव जरी नुसते कानी पडले की त्यांनी जपलेल्या शिक्षण, विकास आणि समाजसेवा या मूल्यांची एक क्षणात आठवण होतेच होते.

**– प्रा. डॉ. दुर्गाचरण अरुण भागवत,**
विभागप्रमुख, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर.

जनप्रवास
बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५

# फार्मसी परीक्षेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च २०२४ घेण्यात आलेल्या अंतिम वर्ष एम. फार्मसी परिक्षेमध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी शाखेने उत्कृष्ट यश संपादन केले आहे. शिवाजी विद्यापीठ गुणवता यादीत नऊ क्रमांक पटकावुन महाविद्यालयांची उज्वल यशाची परंपरा यावर्षी कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एम. फार्मसीचा निकाल १०० टक्के लागला असुन यामध्ये नऊ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठाच्या गुणवता यादीत महाविद्यालयाच्या पुजा पुजारी हिचा सीजीपीए (९.५१), क्रांती देशमुख हिचा सीजीपीए (९.४१), प्रसाद कोळी याचा सीजीपीए (९.३७), हर्षवर्धन पाटील याचा सीजीपीए (९.३३), दिव्या पाटील हिचा सीजीपीए (९.२६), संभाजी जाधव याचा सीजीपीए (९.२५), वैभव पोडळकर याचा सीजीपीए (९.२२), रोहिणी सरडे हिचा सीजीपीए (९.२०), अभिजित शेडमाके याचा सीजीपीए (९.१९) उज्जवल यशाबदल भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम अभिनंदन केले.

तरुण भारत
मंगळवार, २८ ऑक्टोबर २०२५

# प्रा. प्रमोद पाटील यांना पीएच. डी.

म्हाकवे : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर शाखेतील



प्रा. प्रमोद पाटील यांना संजय घोडावत विद्यापीठ यांच्याकडून पीएच. डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ हेटेरो सायकल्स फोर ट्रीटमेंट ऑफ कॅन्सर या विषयावर संशोधन केले आहे. त्यांचे १६ शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांना डॉ. एस. टी. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल भारतीय विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. शिवाजी कदम तसेच प्राचार्य एच. एन. मोरे, उपप्राचार्य एम. एस. भाटिया यांनी अभिनंदन केले. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

लोकमत

शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५ |

# एम. फार्मसी क्षेत्रात संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध : डॉ. मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : एम. फार्मसी क्षेत्रात संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध होत असल्याचे प्रतिपादन भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. एच. एन. मोरे यांनी येथे बोलताना केले.

'भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष एम. फार्मसी वर्गातील विद्यार्थी यांना अभ्यासक्रम, उच्चशिक्षण, रोजगाराच्या संधी इत्यादी बाबींची माहिती देण्यासाठी इन्डक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, डॉ. डी. ए. भागवत, डॉ. सचिन माळी यांच्या हस्ते संस्थापक कुलपती पतंगराव कदम यांच्या प्रतिमा पूजनाने झाले.

प्राचार्य डॉ. मोरे, डॉ. डी. ए. भागवत यांनी मार्गदर्शन केले. प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. डॉ. सचिन माळी यांनी अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, करिअरच्या संधी आणि नोकरीच्या अपेक्षांबद्दल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन दीपाली नावडकर हिने तर प्रा. डॉ. सचिन माळी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. पी. बी. वर्णे, प्रा. डॉ. एफ. ए. तांबोळी, डॉ. ए. जे. शिंदे उपस्थित होते. (वा. प्र.)

पुण्य नगरी

बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# भारती विद्यापीठमध्ये 'इंडक्शन प्रोग्रॅम'

कोल्हापूर : येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष डी. फार्मसी व बी. फार्मसी वर्गातील विद्यार्थी व पालक यांना फार्मसी अभ्यासक्रम, उच्च शिक्षण तसेच रोजगारांच्या संधी इत्यादी बाबींची माहिती देण्यासाठी इंडक्शन प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.

प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया यांच्या हस्ते संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी ॲकॅडमिक इन्चार्ज डॉ. डी. ए. भागवत, प्रा. आर. जे. जरग प्रमुख उपस्थित होते. स्वागत प्रा. पी. एस. मरळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी कार्यवाह डॉ. विश्वजित कदम यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा. पी. एस. मरळे, प्रा. पी. के. काकडे यांनी केले. आभार प्रा. ए. पी. जाधव यांनी मानले.



भारती विद्यापीठात आयोजित इंडक्शन प्रोग्रॅमच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. डी. ए. भागवत, प्रा. आर. जे. जरग आदी.

कोल्हापूर

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

५

● रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५



कोल्हापूर : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये निर्भया पथक असिस्टंट पोलीस निरिक्षक स्वाती यादव यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे. सोबत डॉ. एन. एम. भाटिया, डॉ. एम. एस. भाटिया.

# महिला सुरक्षेसाठी निर्भया पथक विशेष उपक्रम

**• कोल्हापूर निर्भया पथक असिस्टंट पोलीस निरिक्षक स्वाती यादव यांचे प्रतिपादन**

जनप्रवास : कोल्हापूर

भारती विद्यापीठाची मी माजी विद्यार्थिनी असून मला भारती विद्यापीठाचा अभिमान वाटतो. या महाविद्यालयात गरिबांसाठी शिक्षणाची दार उघडी आहेत. शहरातील मुली, महिलांची छेडछाड, विनयभंग किंवा इतर अनुचित प्रकार रोखण्यासाठी निर्भया पथक कार्यरत आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर निर्भया पथक असिस्टंट पोलीस निरिक्षक स्वाती यादव यांनी केले.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून निर्भया पथक महिला सुरक्षेसाठी एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे अध्यक्षस्थानी होते, असे प्रतिपादन केले.

यादव म्हणाल्या, शाळा, महाविद्यालये, बस स्टँड, रेल्वे स्टेशन, मॉल्स, बाजारपेठा, उद्याने आणि निर्जन ठिकाणी हे पथक नियमितपणे गस्त घालते. टवाळखोरांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना कायद्यानुसार शिक्षा केली जाते. निर्भयापथक महिलांमध्ये जनजागृती आणि प्रबोधन करते. या पथकातील अधिकारी शाळा-महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थिनींशी संवाद साधतात. त्यांना त्यांच्या हक्कांविषयी, स्वसंरक्षणाविषयी आणि सुरक्षिततेच्या उपायांबद्दल मार्गदर्शन करतात. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना त्वरित प्रतिसाद देण्यासाठी हे पथक सज्ज असते. महिलांनी ११२ किंवा १०९१ या हेल्पलाइन क्रमांकाला फोन करावा.

प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे म्हणाले, महाविद्यालयातील 'निर्भया पथक' हा महाराष्ट्र पोलीस दलाचा महत्वाचा घटक आहे. मुंबई आणि नवी मुंबई पोलिसांचा, महिला आणि बालकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सुरु केलेला एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. जो महिलांसाठी भयमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या पोलिसांच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

सूत्रसंचालन विद्यार्थिनी श्रुती किल्लेदार यांनी केले. डॉ. एन. एम. भाटिया यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. डी. टी. गायकवाड, प्रा. आर. जे. जरग, डॉ. ए. जे. शिंदे, डॉ. एफ. ए. तांबोळी, डॉ. एस. ए. अरविंदेकर, प्रा. पी. के. माने, प्रा. विशिन पाटील, प्रा. पूजा केनवडे, किशोर हराळे आदी उपस्थित होते.

कोल्हापूर
दैनिक जनप्रवास वाचकांचा राजा
• शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५



कोल्हापूर : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये अभिजित कदम यांना स्मृतिदिनी अभिवादन करताना महाविद्यालयातील मान्यवर.

# अभिजित कदम यांना स्मृतिदिनी अभिवादन

## • भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये कार्यक्रम

जनप्रवास : कोल्हापूर

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये अभिजित कदम यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, अभिजित कदम यांना फुटबॉल खेळण्याची खूप आवड होती. त्यांनी इंजिनिअरिंग क्षेत्रात पदवी शिक्षण पूर्ण केले. एमबीएसाठी प्रवेश घेतला होता. तरुणांचे युथ आयडॉल म्हणून ओळखले जायचे, ते त्यांच्या धाडसी आणि जनतेच्या भल्याचा विचार करणाऱ्या स्वभावासाठी ओळखले जात असत. त्यांनी कमी वयातच आपल्या बोलण्याच्या कौशल्याने आणि नेतृत्वाने लोकांच्या मनात स्थान निर्माण केले होते. अभिजित कदम मेमोरियल फाउंडेशन'च्या वतीने प्रतिवर्षी मानवतावादी दृष्टिकोनातून जनसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेला हा पुरस्कार प्रदान केला जातो. भारती विद्यापीठाच्या माध्यमातून आणि फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे, आरोग्य शिबिरे आयोजित करणे, असे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. ज्यामध्ये दादांचे कार्य आणि आठवणी जागृत ठेवल्या जातात. त्यांच्या स्मृती आजही अनेक लोकांच्या मनात प्रेरणादायी आहेत. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. एन. एम. भाटिया, डॉ. एफ. ए. तांबोळी, डॉ. डी. ए. भागवत, डॉ. ए. जे. शिंदे, प्रा. डी. व्ही. माऊली, प्रा. व्ही. टी. पवार, प्रा. आर. जे. जरग, प्रा. डॉ. सचिन माळी, प्रा. आशा जाधव, प्रा. डॉ. पी. बी. पाटील, प्रा. आर. आर. जरग, व्ही. जे. पाटील आदी उपस्थित होते.

कोल्हापूर

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

• बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५

# लसीकरणामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते

• लोकनियुक्त सरपंच ए. व्ही. कांवळे यांचे मत

जनप्रवास : कोल्हापूर

लसीकरण हे संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण मिळवण्याचे सर्वात प्रभावी आणि सुरक्षित साधन आहे. लसी शरीरात रोगांविरुद्ध प्रतिकार शक्ती निर्माण करतात, असे मत लोकनियुक्त सरपंच ए. व्ही. कांवळे यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर शाखेच्या वतीने ६४ व्या राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह शिबीर मोरेवाडीत आयोजित केले आहे. या सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, प्रा. आर. जे. जरग, प्रा. सी. पी. के. माने, प्रा. आशा जाधव, प्रसाद कांवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



मोरेवाडी येथील आयोजित शिबिरात सरपंच ए. व्ही. कांवळे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया. सोबत मान्यवर.

सरपंच कांवळे म्हणाले, भविष्यातील गंभीर आजारांचा धोका कमी करतात. पोलिओ, गोवर, क्षयरोग, हिपॅटायटिस, कर्करोगाचे काही प्रकार आणि कोविडयांसारख्या अनेक धोकादायक आजारांना लसीकरणाने रोखता येतेबालक, प्रौढ, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी वेळेवर व पूर्ण डोस घेणे अत्यंत आवश्यक आहे. लसीकरण केल्याने फक्त व्यक्ती नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाज सुरक्षित राहतो रोगप्रसार थांबविण्यासाठी आणि निरोगी भविष्य घडवण्यासाठी लसीकरण ही अत्यंत महत्त्वांची जबाबदारी आहे. उपप्राचार्य डॉ. भाटीया म्हणाले, भाषणात लसीकरणामुळे जगातील ३० लाखांहून अधिक मृत्यू दरवर्षी टाळले जातात.

न्यूमोनियामुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्या ३ पैकी २ मुले अपूर्ण किंवा न लसीकरण केलेली असतात. गंभीर आजार, अपंगत्व आणि मृत्यू टाळता येतात. लसी घेतल्यामुळे व्यक्ती तसेच संपूर्ण समाज सुरक्षित राहतो आणि निरोगी भविष्य सुनिश्चित होते.

यावेळी प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूर

दैनिक जनप्रवास

• मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५

# फ्रेशर्स फिएस्टा कॉलेज प्रवासाचा अविस्मरणीय क्षण


**• प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांचे प्रतिपादन**

जनप्रवास : कोल्हापूर

महाविद्यालयातील वातावरणाशी नवीन विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर समरस करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयीन कालखंड हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे. फ्रेशर्स फिएस्टा कॉलेज प्रवासाचा अविस्मरणीय क्षण आहे, असे मत प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी केले.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी शाखेत बी फार्मसी, डी फार्मसी व एम. फार्मसी नवीन शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'फ्रेशर्स फिएस्टा' कार्यक्रमात ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी होण्याचे बीज या कार्यक्रमातून विकसित होतात. शाळेतून थेट



कोल्हापूर : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमधील कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून करताना प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे. सोबत उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. एन. एम. भाटिया आदी.

कॉलेजमध्ये आलेल्या नवीन विद्यार्थ्यांना कॉलेजचे वातावरण, नियम आणि संस्कृतीची ओळख करून देणे हा मुख्य उद्देश असतो. नवीन विद्यार्थी आणि वरिष्ठ विद्यार्थी यांच्यात संवाद आणि सलोखा निर्माण करणे, जेणेकरून त्यांच्यातील संकोच कमी होईल.

एकत्रितपणाची भावना सर्व विद्यार्थ्यांना एकत्र आणून, मैत्री आणि सहकार्याची भावना वाढवणे. नवीन विद्यार्थ्यांना त्यांची लपलेली प्रतिभा आणि कलागुण सादर करण्याची संधी मिळते.

विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे व नवीन विद्यार्थ्यांसाठी विशेष गुण प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. एम. फार्मची वैष्णवी डवरे हीस मिस फ्रेशर्स, अभिषेक महाडिक यास मिस्टर फ्रेशर्स २०२५ म्हणून सन्मानित केले.

बी. फार्मची श्रेया चौगुले मिस फ्रेशर्स व शुभंकर पाटील यास मिस्टर फ्रेशर्स २०२५ म्हणून सन्मानित केले. डिप्लोमाची श्रेया बोमन्ना हीस मिस फ्रेशर्स व ओम पाटील यास मिस्टर फ्रेशर्स म्हणून सन्मानित केले.

या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सचिन माळी, प्रा. आर. डी. चौगले, डॉ. पी. बी. पाटील, प्रा. सुजित साळोखे, प्रा. विद्या काकडे, सानिका लवटे तसेच द्वितीय वर्ष बी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी केले. प्रास्ताविक रोशनी धामेजा यांनी केले. दीपाली नावडकर यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया, डॉ. एन. एम. भाटिया आदी उपस्थित होते.